48

Volume - 5 | Issue - 2 | August - 2017

RESEARCH DIRECTION

UGC APPROVED

International Recognition Interdisciplinary Research Journal

Impact Factor 5.1723(UIF)

ISSN 2321-5488

# भारतीय कर सुधारणा प्रक्रियेतील एक ऐतिहासिक पाऊल– वस्तू व सेवा कर (जीएसटी)




प्रा. सोमनाथ वसंतराव पाटील

सोमनाथ वसंतराव पाटील

एम.ए.एम.फिल,सेट.(अर्थशास्त्र) एस. एस. ढमढेरे महाविद्यालय ,तळेगाव ढमढेरे ता. शिरूर, जि. पुणे.

सारांश :– एक जुलै 2017 पासून भारतामध्ये वस्तू व सेवा कर (जीएसटी) लागू झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देशातील करप्रक्रियेत आमूलाग्र बदल घडविणारा ऐतिहासिक असा वस्तू व सेवा कर (जीएसटी) हा एकच अप्रत्यक्ष कर लागू करण्यात आला आहे. देशभरात एकसमान करप्रणाली असावी असा ...पृष्ठ क्र.– 40

Editor - In - Chief - S.P. Rajguru

तमसो मा ज्योतिर्गमय

Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

ISSN 2321-5488

# RESEARCH DIRECTIONS

A Multi-Disciplinary Peer-Reviewed International Research Journal

**EDITOR IN CHIEF**

S.P. RAJGURU
Asst. Prof. (Dept. of English)

**ADVISORY BOARD**

Dr. Shrikant Yelegaonkar
Annie John
Santosh Kumar Behera

Debabrata Debnath
T. Manichander
Mr. Sanjeev Kumar Mishra

T. N. Kolekar
Saket Raman
Ajit Mondal

Kavita bollu
Lavyana Channa
Vidya Miskin

Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon ... Tal. Shirur

Scanned with CamScanner

ISSN 2321-5488

# RESEARCH DIRECTIONS

## A Multi-Disciplinary Peer-Reviewed International Research Journal

'RESEARCH DIRECTIONS' - A Peer-Reviewed Multi Disciplinary International Journal with quarterly periodicity aims at promoting research in Humanities, Social Sciences, Engineering, Law, Education and Management and so on. The journal will also help to explore creative talents and bring out creative writings in the form of research articles, reviews, poetry, short story, etc. with a view to establish, understand and maintain harmony among different disciplines and spheres. Above all, emphasis and priority will be given to pure research it will mould the world in future.

The purpose is to disseminate an authentic body of research which further promotes knowledge, understanding and an intellectual exercise among the research fraternity. Contributors are requested to forward their writings to Prof. Santosh Rajguru Editor and Publisher, 'RESEARCH DIRECTIONNS'. The papers will be published after thorough review by experts.

**Subscription Rate**

**One Year : Rs. 3,000/-**

**Address for Correspondence**
Prof. Santosh P. Rajguru
Editor-in-Chief
56, 'PARASHURAM' Ayodhya Nagari,
Near Reliance Office, Hydrabad Road, Dahitane,
Solapur - 413006. (Maharashtra)
E-mail : santosh.august@gmail.com
santosh.august@yahoo.com
Cell : 09595359435

**Visit us at : http://researchdirection.org/**

Follow us on Facebook & Twitter
santosh.august@gmail.com & Santosh Raj

Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College,
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur,
Dist Pune-412 208
तमसो मा ज्योतिर्गमय
Scanned with CamScanner

**Research Directions**

International Multidisciplinary Research Journal

ISSN NO:- 2321-5488 Impact Factor : 5.1723(UIF) Vol.- 5, Issue - 2, August -2017





| Sr. No | Title And Name Of The Author (S) | Page No |
|---|---|---|
| 1 | A Study On Knowledge, Attitude And Practices Of Parents Towards Their Special Needs Children<br>Djodybascarane L. and Dr. P. Swarnakumari | 1 |
| 2 | Profile Of Slum Areas: With Reference To Karnataka<br>Mallikarjun Nagashetty | 4 |
| 3 | Market Forces And Performing Arts<br>Dr. Hrishikesh Soman | 9 |
| 4 | The Burden Of Depression And Suicidalideation Among College Students<br>Jaseem Koorankot , Afsal Moosa and Saranya T.S. | 14 |
| 5 | An Analysis Of Semi-Urban Youth Consumers Behaviour Towards Online Shopping Using Mobile Applications<br>(A Study conducted at Malappuram District)<br>Fazeen Rasheed A. K . | 19 |
| 6 | Influence Of Self Regulation On Academic Achievement Of IX Class Students<br>C. Geetha and Nangaiyarkarasi | 28 |


Principal

S.S.Dhamdhere Arts & Commerce College.

Talegaon Dhamdhere, Tal. Shirur

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| 7 | Professional Commitment Of Government School Teachers In Virudhunagar District<br>D. Hema Gnana Suganthi and R. Shanmuga Priya | 31 |
| 8 | A Study Of Internet Addiction Among High School Students.<br>Dr. Darsana B. G. | 37 |
| 9 | भारतीय कर सुधारणा प्रक्रियेतील एक ऐतिहासिक पाऊल– वस्तू व सेवा कर (जीएसटी)<br>प्रा. सोमनाथ वसंतराव पाटील | 40 |


Principal
B.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist. Pune-412 208

Scanned with CamScanner

ISSN: 2321-5488 IMPACT FACTOR : 5.1723(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 2 | AUGUST - 2017

RESEARCH DIRECTIONS

# भारतीय कर सुधारणा प्रक्रियेतील एक ऐतिहासिक पाऊल– वस्तू व सेवा कर (जीएसटी)




प्रा. सोमनाथ वसंतराव पाटील
एम.ए.एम.फिल,सेट.(अर्थशास्त्र) एस. एस. ढमढेरे महाविद्यालय ,
तळेगाव ढमढेरे ता. शिरूर, जि. पुणे.

*गोशवारा*

एक जुलै 2017 पासून भारतामध्ये वस्तू व सेवा कर (जीएसटी) लागू झाला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात देशातील करप्रक्रियेत आमूलाग्र बदल घडविणारा ऐतिहासिक असा वस्तू व सेवा कर (जीएसटी) हा एकच अप्रत्यक्ष कर लागू करण्यात आला आहे. देशभरात एकसमान करप्रणाली असावी असा उद्देश यामागे होता. केंद्र आणि राज्य सरकारद्वारे त्यापूर्वी लागू असलेले अनेक अप्रत्यक्ष कर रद्द करून ही करप्रणाली भारतात लागू करण्यात आली. जीएसटी लागू करण्यासाठी 30 जून 2017 च्या रात्री संसदेचे विशेष अधिवेशन झाले. त्यात राष्ट्रपतींनी मध्यरात्रीच्या सुमारास जीएसटी लागू झाल्याची अधिकृत घोषणा केली. जीएसटी अंतर्गत 1जुलै 2017 पासून  देशात 0 टक्के, 5 टक्के, 12 टक्के, 18 टक्के, व 28 टक्के असे पाच कर दर ठरविण्यात आले आहेत.

*कळीचे शब्द*– जीएसटी, वस्तू व सेवा कर, करसुधारणा,

## *प्रस्तावना*

स्वातंत्र्योत्तर काळात देशातील करप्रक्रियेत आमूलाग्र बदल घडविणारा ऐतिहासिक असा वस्तू व सेवा कर (जीएसटी) हा एकच अप्रत्यक्ष कर लागू करण्यात आला आहे. जीएसटी अंतर्गत 1 जुलै 2017 पासून  देशातविविध वस्तूव सेवांवर0 टक्के, 5 टक्के, 12 टक्के, 18 टक्के, व 28 टक्के असे पाच कराचे दर आकारले जाणार आहेत.

संविधानाप्रमाणे भारतामध्ये संघ राज्यात्मक व्यवस्था आहे. संविधानाच्या परिशिष्ट 7 च्या केंद्रीय सूची, राज्य सूची व संयुक्त सूचीप्रमाणे भारताची कर व्यवस्था केंद्रीय पातळीवरील कर उदा. प्राप्ती, आयात– निर्यात कर, उत्पादन शुल्क, केंद्रीय विक्रीकर इ.) तसेच राज्य पातळीवरील करउदा. नागरी जमीन महसूल, राजस्व व नोंदणी कर, मालमत्ता कर, व्यवसाय कर, वीज कर, वाहन कर, इंधन कर, करमणूक कर, विक्री कर व अबकारी कर इ. व काही स्थानिक स्वराज्य संस्थांचे कर अशी अत्यंत व्यापक, गुंतागुंतीची व साहजिकच करदात्यांना अवघड तर व्यापार वृद्धीला अडथळा ठरलीआहे. देशात करावर कर आकारल्याने अनेक दुष्परिणाम झाले. वस्तू व सेवांच्या किमती फुगल्या. भाववाढझाली. कर व्यवस्थेच्या अनावश्यक गर्दीमुळे गोंधळ, गैरकारभार, कर चुकवेगिरी व भ्रष्टाचार वाढला. सन 2000 मध्ये तत्कालीन अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारने  अप्रत्यक्ष करांच्या क्लीस्ट प्रणालीतून ग्राहक व व्यवसायाची सूटका करण्याच्या प्रयत्नाची सुरुवात केली. अप्रत्यक्ष कर सुधारणांचा भाग म्हणून केळकर समितीने 2003 मध्ये अशा कराची शिफारस केली होती. डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीची तयारी करण्यासाठी कर विध्येयकाचा मसूदा तयार केला होता. त्यावेळी समितीने या मसूदयाचे वर्णन " सर्व दुंखावर एक औषध " असे केले होते. त्यानंतर 2006 मध्ये युपीए सरकारने जीएसटी विधेयक तयार केले व 2011 मध्ये ते मांडले होते. 1947 नंतरचे सर्वात महत्त्वाचे करसुधारणा विधेयक म्हणून वस्तू व सेवा कर विधेयकाचे महत्त्व आहे. या विधेयकामुळे केंद्रीय अबकारी कर, राज्याचा मूल्यवर्धित कर, करमणूक कर, जकात, प्रवेश कर, चौनीच्या वस्तूवरील कर, खरेदी कर यांच्या ऐवजी एकच वस्तू व सेवा कर हा कर असेल.

## *संशोधन पध्दती:–*

प्रस्तुत संशोधन हे विश्लेषणात्मक असून दुय्यम साधनसामुग्रीवर आधारित आहेत. दुय्यम साधनसामुग्रीसाठी संदर्भ पुस्तके,जर्नल्स,वर्तमानपत्रे, व विविध वेबसाईटसचा वापर केला आहे.

## *संशोधनाची उद्दिष्टे:–*

1. भारतीय कर रचना व सुधारणा प्रक्रिया अभ्यासने
2. जीएसटीची संकल्पना व फायदे अभ्यासने
3. जीएसटीचे वस्तूंच्या किमतीवरील संभाव्य परिणाम अभ्यासने

## *जीएसटीचा अर्थ –*

जीएसटी म्हणजे वस्तू व सेवा कर असून यापुढे देशामध्ये वस्तू किंवा सेवांवर हा एकच कर लागू राहील. वस्तू व सेवा कर हा इतर सर्व करांची



Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur,
Dist. Pune-412 208
तमसो मा ज्योतिर्गमय

Scanned with CamScanner

जागा घेणार असून केंद्राच्या व राज्याच्या अनेक करांना तो एकच पर्याय राहणार आहे. वस्तू आणि सेवा करात केंद्राचे 8 कर वआणि राज्याचे 9 प्रकारचे कर असे एकूण खालील 17 कर विलीन होतील.

**केंद्र सरकारचे कर –**

केंद्रीय उत्पादन शुल्क, अतिरिक्त उत्पादनशुल्क, उत्पादनशुल्क (औषधी आणि प्रसाधन सामग्री), अतिरिक्त उत्पादन शुल्क (कापड व उत्पादने) , अतिरिक्त सीमा शुल्क,विशेष अतिरिक्त सीमा शुल्क, सेवाकर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याशी संबधित असलेला केंद्रीय अधिभार आणि उपकर इ.

**राज्य सरकारचे कर–**

राज्याचा मूल्यवर्धित कर, विक्रीकर, ऐषआराम कर, प्रवेश कर, (ऑक्ट्रॉय, एलबीटी, वाहनांवरील प्रवेशकर,वस्तूवरील प्रवेश कर), करमणूक आणि मनोरंजन कर, जाहिरातीवरील कर, खरेदीकर,वन विकास कर (वनउपजाच्या विक्रीवरील कर) लॉटरी, बेटींग, जुगारावरील कर, वस्तू आणि सेवांच्या पुरवठ्याशी संबधित असलेला कर आणि उपकर यांचा समावेश आहे.

**जीएसटीची जागतिक स्थिती**

जगातील अनेक विकसित देशात वस्तू व सेवा कर पद्धतीची करप्रणाली अस्तित्वात आहे. जीएसटी हा कर काही देशांमध्ये वॅट किंवा मूल्यवर्धित कर म्हणून ओळखला जातो. जागतिक स्तरावर जीएसटी सर्वप्रथम 1950 मध्ये फ्रान्समध्ये वापरला गेला. सध्या सुमारे 160 देशांमध्ये ही कर प्रणाली वापरात आहे. यामध्ये यूरोपियन युनियन आणि एशिया खंडातील श्रीलंका, सिंगापूर आणि चीन या देशांचा समावेश होते.

**जीएसटीचे फायदे**

वस्तू आणि सेवा कर प्रणालीमुळे एक राष्ट्र, एक कर आणि एकसंघ बाजारपेठ ही संकल्पना प्रत्यक्षात आकाराला येणार असून त्यामुळे कर आकारणीत सुटसुटीतपणा येणार आहे. वस्तू व सेवा करामुळे देशांतर्गत उत्पादन वाढीस चालना मिळेल व महसुलातही वाढ होईल. वस्तू व सेवा करामुळे व्यापार–व्यवसाय करणे सोपे होईल. फसवणूक करून टॅक्स चोरी करणाऱ्यांसाठी या कायद्यामध्ये दंडाची आणि शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे. प्रामाणिकपणे व्यापारी व उद्योगांना या करप्रणालीतून नक्कीच संरक्षण मिळेल त्यामुळे व्यापार वाढेल.

या कर प्रणालीत केंद्र आणि राज्याचे 17 कर विलीन होणार असल्याने एकच करप्रणालीतून कर भरावा लागेल. पुर्वी व्यापाऱ्यांना अनेक प्रकारचे रिटर्नस भरावे लागत मात्र या त्रासातून सुटका होणार असून व्यापाऱ्यांना केवळ एकच रिटर्नस भरावे लागेल.

वेगवेगळया राज्यात वेगवेगळे मूल्यवर्धित कर कायदे, कर दर यामुळे देशाची विभिन्न आर्थिक क्षेत्रात विभागणी होत होती. तसेच जकात, प्रवेशकर, तपासणी नाके, यासारख्या अडथळयांना सामोरे जावे लागत होते या करप्रणालीमुळे हे थांबेल.

केंद्र व राज्य शासनाचे बहुतांश अप्रत्यक्ष कर एकत्र आल्याने करप्रणाली सुटसुटीत व सोपी होईल.

करावर कर लागत नसल्याने वस्तूंच्या किंमती स्वस्त होऊन त्याचा ग्राहकांना लाभ मिळेल.

देशी वा विदेशी मद्य, कच्चे तेल, डिझेल, पेट्रोल, नॅचरल गॅस, विमानाचे इंधन या गोष्टी जीएसटी क्षेत्राबाहेरील वस्तू आहेत. मात्र ठराविक कालावधीनंतर पेट्रोलियम वस्तू जीएसटीअंतर्गत आणण्याचे प्रयोजन संविधान संशोधन अधिनियमात करण्यात आले आहे. याबाबतचा निर्णय जीएसटी कौन्सीलमध्ये होईल.

**जीएसटी कर आकारणीची पद्धती**

जीएसटी कर आकारणीसाठी जीएसटी मंडळ स्थापन केले असून त्याचे अध्यक्ष केंद्रीय अर्थमंत्री असतील व सदस्य अर्थ राज्यमंत्री असतील.

**जीएसटी परिषदेची रचना**

1. कर आकारणीसाठी जीएसटी परिषद स्थापन करण्यात येणार आहे.
2. अध्यक्ष– केंद्रीय अर्थमंत्री.
3. उपाध्यक्ष– कुठल्याही एका राज्याचे अर्थ मंत्री .
4. सदस्य– अर्थ राज्यमंत्री, राज्यांचे अर्थमंत्री .
5. मतदानात केंद्राचा वाटा 1 / 3 व राज्यांचा 2 / 3 असेल.
6. जीएसटी परिषदेत 1 / 3 सदस्य केंद्राचे तर 2 / 3 राज्यांचे असतील.
7. कुठलाही कर आकारताना 75 टक्के मतांची आवश्यकता असेल.
8. केंद्र व राज्ये यांना कर आकारणीचा समांतर अधिकार असेल.

जीएसटी अंतर्गत तीन करांचा समावेश आहे.

* केंद्रीय वस्तू व सेवा कर – उत्पादन शुल्क, सेवा कर, इ. ऐवजी हा कर (सीजीएसटी)
* राज्य वस्तू व सेवा कर – विक्रीकर, कंत्राट कर, ऐशोआराम शूल्क, मनोरंजन कर इ. (एसजीएसटी)
* आंतरराज्य वस्तू व सेवा कर – एका राज्यामधून दूसऱ्या राज्यामधील विक्रीवरील कर (आयजीएसटी)

केंद्र सरकार केंद्रीय वस्तू सेवा कराच्या स्वरूपात कर बसवून त्याची वसुली करणार आहे तर राज्य शासन वस्तू किंवा सेवांच्या किंवा दोन्हीच्या राज्यांतर्गत होणाऱ्या पुरवठ्यावर राज्य वस्तू आणि सेवा कर बसवून करवसुली करणार आहे.जीएसटी हा उपभोगावर आधारित टॅक्स आहे. ज्या राज्यामध्ये वस्तू किंवा सेवांचा उपभोग होईल तिथे कर जमा होईल.

**जीएसटीचे विविध करदर व त्यामध्ये समाविष्ट असलेल्या वस्तू**

जीएसटी अंतर्गत 1 जुलै 2017 पासून देशात 0 टक्के, 5 टक्के, 12 टक्के, 18 टक्के, व 28 टक्के असे पाच कर दर ठरविण्यात आले आहेत. या व्यतीरिक्त 28 टक्के गटात असलेल्या वस्तू व सेवा करावर 1 टक्के ते 15 टक्के इतका अतिरीक्त अधिभार असेल.



Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist. Pune-412 208
Scanned with CamScanner

*जीएसटी मधून सूट असलेल्या वस्तू*

खुले खाद्यान (गहू,ज्वारी, तांदुळ, इ.), गूळ, दूध, अंडे, दही, लस्सी, खुले पनीर , मार्क नसलेला नैसर्गिक मध, ताज्या भाज्या, खुले पीठ, मैदा, बेसन पीठ, प्रसाद, साधे मीठ, गर्भ निरोधक गोळया, आरोग्य सेवा, शैक्षणिक सेवा, कच्चे जूट, व कच्चे रेशीम.

+ 5 टक्के जीएसटी लागू असलेल्या वस्तू

साखर, चहापत्ती, भाजलेले कॉफी बीन्स, खाद्य तेल, स्किम्ड दूध पावडर, बाळां करीता दूधाचा आहार, पॅकिंगचे पनीर, कॉटन धागा, फॅब्रिक, सरकंड्याचे झाडू, फुल भारी झाडू, बूट चप्पल ( रु. 500 च्या आतील ), न्यूजप्रिंट, रेशनचे रॉकेल, घरगूती गॅस, कोळसा, सोलर फोटोवाल्टाइक सेल आणि मोडयुल्स, कॉटन फायबर, कपडे ( रु 1,000 पर्यंत )

+ 12 टक्के जीएसटी लागू असलेल्या वस्तू

लोणी, दही, मोबाईल, काजू, बदाम, सॉसेज, फ्रुट ज्यूस, पॅकड् नारळ पाणी, अगरबत्ती, छत्री, कपडे (रु 1,000 वरील)

+ 18 टक्के जीएसटी लागू असलेल्या वस्तू

केशतेल, साबण, टूथपेस्ट, भांडवली वस्तू, औद्योगिक घटक, पास्ता, कॉर्न फ्लेक्स, जाम, सूप, आइस्क्रीम, शौचालय, तसेच फेसियल टिशू, लोखंड आणि स्टील, फाउंटेन पेन, संगणक, बूट व चप्पल ( रु. 500 वरील )

+ 28 टक्के जीएसटी लागू असलेल्या वस्तू

ग्राहकोपयोगी वस्तू (फ्रिज, रेफ्रीजरेटर, इ.) सिमेंट, च्युइंग गम, कस्टर्ड पावडर, परफ्युम, शॅम्पू, मेक अप सामान, फटाके, मोटारसायकल

*जीएसटीचे वस्तूंच्या किमतीवरील संभाव्य परिणाम*

जीएसटीमुळे सामान्य लोकांमध्ये प्रश्न हाच आहे की, जीएसटीचे सामान्यांच्या जीवनावर काय परिणाम होणार आहे. त्यासाठी जीएसटीचे वस्तूंच्या किमतीवरील संभाव्य परिणाम अभ्यासल्यास याचे उत्तर मिळते.

*जीएसटीमुळे स्वस्त होणाऱ्यां वस्तू*

बिस्किटे, चॉकलेट, केशतेल, साबण, टूथपेस्ट, टीव्ही, वॉशिंग मशिन, प्राथमिक स्मार्टफोन, सिमेंट, चहा, कॉफी, साखर, चित्रपटांची तिकिटे, नाटकांची तिकिटे, हॉटेलमधील खाणे, दुचाकी, प्राथमिक कार फर्निचर, खासगी टॅक्सी सेवा, दूध, धान्ये, भाज्या, फळे, आलिशान कार, मिठाई, झाडू, मेणबत्ती, सायकल, अॅचल्युमिनियमची भांडी, तांब्याची भांडी, खते.

*जीएसटीमुळे महाग होणाऱ्यां वस्तू*

भ्रमणभाष देयक, आयुर्विमा पॉलिसी, बँकींग सेवा, गुंतवणूक व्यवस्थापन सेवा, वाय–फाय सेवा, डीटीएच् सेवा, तिकिटांचे ऑनलाइन बुकिंग, घरभाडे, आरोग्यसेवा, शाळेचे शुल्क, कुरियर, मेट्रो प्रवास, एअरिएटेड पेये, शाम्पू, अत्तर, सोने, सिगारेट्स, पानमसाला, लोणी, चीज, सुकामेवा, रेझर, मनगटी घड्याळ, व्हिडिओ गेम्स, स्टोव्ह, इलेक्ट्रिक हॉट प्लेट, वॉल पेपर, प्लास्टर, टायर, प्लास्टिक वस्तू, टारपोलिनकर नसलेल्या वस्तू ताजे दूध, अन्नधान्य, मीठ, तांदूळ, पापड, रोटीचाराध्यवत, निरोध, गर्भनिरोधक औषधे, पुस्तके, जळाऊ लाकूड, बांगड्या.

सर्वसामान्य लोकांच्या उपभोगाच्या जवळपास 53 टक्के वस्तूंना जीएसटीमध्ये करमाफी देण्यात आली आहे. 32 टक्के वस्तूंवर केवळ म्हणजे 5 टक्के कराचा दर असून सामान्य माणसाच्या गरजेच्या वस्तू करमुक्त ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अन्नधान्य, अंडी, शेती उत्पादने, शेती बियाणे, पुस्तके अशा अनेक वस्तू करमुक्त ठेवण्यात आल्या आहेत तर शिक्षण, आरोग्य, लोकल प्रवाससेवासारख्या अनेक महत्वाच्या सेवा ही करमुक्त ठेवण्यात आल्या आहेत.

जीएसटी करप्रणाली अंतर्गत 20 लाखापर्यंतची उलाढाल करमुक्त ठेवण्यात आली आहे. हॉटेल व्यवसायामध्ये 50 लाखापेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यावसायिकांना या कर प्रणालीत 5 टक्के कर दर लागेल, वातानुकुलित यंत्रणा असलेल्या हॉटेल्सना 12 टक्के तर मद्य वितरित होणाऱ्या वातानुकुलित हॉटेल्सला 18 टक्के कर दर लागेल.

*जीएसटी बाबत आक्षेप*

*1.जीएसटी बाबत राज्यांचे आक्षेप*

जीएसटीमुळे अनेक राज्यांना महसूल बुडण्याची भीती वाटत आहे. मात्र जीएसटी लागू केल्यानंतर राज्यांना पहिली पाच वर्षे केंद्र सरकार महसुलातील तोटा भरून देणार आहे. ज्या राज्यातील ग्राहक जास्त असतील त्या राज्यांना करात जास्त वाटा मिळेल. हा निकष बघता उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, केरळ यांना करात जास्त वाटा मिळेल. तामिळनाडू, महाराष्ट्र व गुजरात या राज्यांना महसूल बुडण्याची भीती वाटते आहे त्यांना भरपाई दिली जाईल. पहिली पाच वर्षे राज्यांना 100 टक्के भरपाई दिली जाणार आहे. अर्थात आज ठरलेले कर दर हे कधीच बदलता येणार नाहीत असेही नाही, भविष्यात दर तीन महिन्यांनी वस्तू आणि सेवा कर परिषदेची बैठक होणार आहेत. त्यात दरांबाबतचा आढावा होईल. राज्याच्या अडचणीच्या बाबी तिथे पुन्हा मांडण्याची संधी मिळेल व त्यात आवश्यक ते बदल घडवून आणता येतील. कायद्यातील त्रुटी दूर करता येतील.

तसेच आपत्कालीन परिस्थितीत, दुष्काळात राज्याला निधी कमी पडला किंवा अशा अतिमहत्वाच्या प्रसंगांना सामोरं जाण्याची दुर्देवाने वेळ आली तर वस्तू आणि सेवा कर प्रणालीच्या परिशिष्ट 279 क प्रमाणे विशेष कर लावण्याचे अधिकार राज्याला मिळणार आहेत. त्यामुळे राज्य संकटात असताना उत्पन्न वाढविणे शक्य आहे.

*2. जीएसटी बाबत व्यापाऱ्यांचे आक्षेप*

जीएसटी बाबत किरकोळ व्यापाऱ्यांचे सर्वात मोठे संघटन कन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स ने म्हटले आहे की, जीएसटीसाठी व्यापाऱ्यांची अद्याप पूर्ण तयारी झालेली नाही. जीएसटी हे तंत्रज्ञानावर आधारीत करप्रणाली असल्याने, त्यात कोणत्याही प्रकारे काही कागदी व्यवहार नसतील. जीएसटीमध्ये देयक, इनपूट क्रेडीट, प्रत्येक व्यापाऱ्याचे गुल्यांकन, वस्तू सोबत सेवांची जोडणी हे सारे नवे विषय असतील, जे सध्याच्या करप्रणाली पेक्षा पूर्ण वेगळे आहेत. देशातीलबहूतांश व्यापारी अजूनही संगणक वापरत नाहीत त्यामुळे त्यांच्यासाठी हे मोठे आव्हान आहे. अर्थात या सर्व अल्पकालीन समस्या असून यथावकाश त्या दूर होतील.

कोणत्याही कर बदलाचे मूल्यमापन करताना काही महत्त्वाचे प्रश्न लक्षात घ्यावे लागतात. ते म्हणजे या बदलामुळे, करदात्यांवरील कराचा बोझा काही प्रमाणात कमी होइल काशिवाय या बदलामुळे सरकारच्या करउत्पन्नात वाढ होईल का आणि या कर बदलामुळे राष्ट्रीय उत्पन्नाच्या वृद्धीचा दर



Principal
S.S.Dhamdhere Arts & Commerce College,
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur,
Dist. Pune 412 208

Scanned with CamScanner

भारतात कर जीएसटीमुळे या सर्व प्रश्नांना सकारात्मक उत्तर मिळणार आहे जीएसटीमुळे व्यवसाय कर भरणारी सोईस्करता वाढणार आहे. कर चुकवेगिरी कमी होवून कर उत्पन्न वाढणार आहे तर वाढत्या व्यवहारामुळे गुंतवणूक, उत्पादन व रोजगार वाढून एकूणच राष्ट्रीय उत्पन्न वाढीस हातभार लागणार आहे.

संदर्भ -

1. Puri V. & Mishra K. (2013), "Indian Economy", 31nd edition, Himalaya Publishing House, Mumbai.
2. Gaurav Dutt & Ashwini Mahajan (2015), "Indian Economy", (71st Revised Edition), S. Chand & Company Ltd, New Delhi.
3. Abda Sachin (May 2017) Effects of goods and services tax on Indian economy, International Education and Research Journal.
4. Panda A, and Patel A. ( July 2010) The Impact of GST on the Indian Tax Scence. SSRN Electronic Journal.
5. पाटील डी. एल., वस्तू व सेवा कर – कर व्यवस्थेचे सिलीलिकरण , दैनिक पुढारी, 1 जुलै 2017
6. झोडापे सु. रा. (2011) राजस्व, विद्या प्रकाशन नागपूर.

Principal
B.S.Dhamdhere Arts & Commerce College
Talegaon Dhamdhere, Tal. Shirur
Dist. Pune-412 208



Scanned with CamScanner